रत्नागिरी टाइम्स

सोमवार, दि. २३ मे २०२२

टाइ

# हळबे महाविद्यालयात वार्षिक मूल्यमापन सत्राचे आयोजन

दोडामार्ग, २२ मे (प्रतिनिधी) - आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांनी अनेक संधी प्राप्त केल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळाले आहेत. विद्यार्थीस्वावलंबी बनविण्याचे कार्य या विस्तार विभागातून होत आहे. यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या विभागात सभागी झाले पाहिजे, असे मत मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक प्रोफेसर डॉ. कुणाल जाधव यांनी व्यक्त केले.

येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई सीताराम हळवे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित केलेल्या वार्षिक मूल्यमापन सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत. या कार्यक्रमास श्री. किरण पाटील, सचिन राऊत, गौतम गायकवाड, प्रशांत कांबळे व क्षेत्र समन्वयक प्रा. यु. टी. परब उपस्थित होते. डॉ. कुणाल जाधव यांनी डी. एल. एल. ई. विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेले उपक्रम आणि शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती माहिती दिली. महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ . सुभाष सावंत यांचा डी. एल.एल.ई विभागाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला . मुंबई विद्यापीठाच्या डी.एल.एल. ई. विभागाचे शैक्षणिक वर्ष २०२२ २३ मधील उडान फेस्टिव्हल व प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.



प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा सत्कार करताना प्रोफेसर डॉ. कुणाल जाधव, गौतम गायकवाड, प्रशांत कांबळे व प्रा. यु. टी. परब) डॉ. सुभाष सावंत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . सुभाष सावंत यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व डी.एल.एल.ई विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमास सर्वोतपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन विस्तार कार्यशिक्षक प्रा. एस. एस. पाडगांवकर यांनी केले तर आभार प्रा. प्रीती प्रसादी यांनी मानले. सदर कार्यक्रमास सिंधुदुर्ग जिल्हयातील महाविद्यालयीन विस्तार कार्यशिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.